# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा/ ८५ /2022-23 दिनांक :- 26/05/2022

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकास कामातील बाधीत होणारी / धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामाची सोबत जोडलेली जाहीर नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर नोटीस प्रत.**

(योगेश गुणिजन)
सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/वृ.प्रा / ८५ /2022-23

दिनांक :- २६ /०५/2022

### // जाहिर नोटीस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम 1975 च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या कलम 8(3) अन्वये या नोटीसव्दारे असे जाहिर करण्यात येत की मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील विकासकामात बाधीत होणारी/धोकादायक झाडे मुळासहित काढणे व पुर्न:रोपन करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 1. | भाईंदर (प.), रेन्सन हॉऊस, डोंगरी तलावली, पो.उत्तन, येथिल घराच्या आवारात 02 नग जंगली कपाशी अंदाजे 50 ते 60 फुट उंच वाढलेली असुन झाडे बाजुच्या घरावर वाकलेली आहेत. जोराच्या वा-याने झाडाच्या फांद्या घराच्या बाजुने ये-जा करणा-या रहिवांश्यांवर पडत असल्याने जिवित हानी व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदरची झाडे काढून पुर्नरोपन करणे शक्य नाही. तरी सदर 02 नग झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. **(श्री.रेनॉल्ड जॉन मेंन्डोंसा यांचे दि.02/05/2022 रोजीचे पत्र)** | 02 नग कपाशी |
| 2. | भाईंदर (पु.), इंद्रेश्वर महादेव चॅरिटेबल ट्रस्ट इंद्रप्रस्थ कॉम्प्लेक्स नवघर गाव येथिल मंदिराच्या आवारात 01 नग गुलमोहरचे झाड अंदाजे 30 ते 35 फुट उंच वाढलेले असुन सदर झाड मंदिरावर पुर्णपणे वाकलेले असुन मंदिराच्या भिंतीला तडे गेलेले आहे. मंदिरात येणा-या नागरिकावर भिंत पडुन जिवित हानी व वित हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदरचे झाड काढून पुर्नरोपन करणे शक्य नाही. तरी सदर 01 नग झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **(सन्मा.नगरसेविका सौ.वंदना विकास पाटील यांचे दि.27/04/2022 रोजीचे पत्र)** | 01 नग गुलमोहर |
| 3. | भाईंदर (पु.), रुम नं. 1, माधव पार्क, आर.एन. पी.पार्क येथिल श्री. गणेश हंचाटे यांच्या घराच्या आवारात 01 नग नारळाचे झाड अंदाजे 30 ते 35 फुट उंच वाढलेले असुन सदर झाड घरावर पुर्णपणे वाकलेले असुन झाडाची मुळे पिण्याच्या पाण्याच्या टाकीच्या आत गेलेली आहेत.जोराच्या वा-याने झाड पडुन जिवित हानी व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदरचे झाड काढून पुर्नरोपन करणे शक्य नाही. तरी सदर 01 नग झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **(सन्मा.नगरसेवक श्री.मदन उदितनारायण सिंह यांचे दि.02/05/2022 रोजीचे पत्र)** | 01 नग नारळ |
| 4. | मौजे भाईंदर,सि.स.क्र.2089 येथे श्री.नोएल व्ही. कोरिया या विकासकाचे इमारत बांधकामातील पायलिंग मध्ये 01 नग आंब्याचे झाड अंदाजे 20 ते 25 फुट उंच बाधीत होत आहे. तसेच सदरचे झाड काढून पुर्नरोपन करणे शक्य नाही. तरी सदर 01 नग झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **(श्री. नोएल व्ही. कोरिया यांचे दि.12/04/2022 रोजीचे पत्र.)** | 01 नग आंबा |
| 5. | भाईंदर (प.), 202 तेंडुलकर सदन, उत्तन रोड, श्री. दत्त मंदिराजवळ, येथिल खाजगी जागेत 02 नग नारळाचे झाडे अंदाजे 40 ते 50 फुट उंच वाढलेले असुन जोराच्या वाऱ्यामुळे ते शेजारील असलेल्या अशोकनगर सोसायटीच्या इमारतीवर झूकलेले आहे.तसेच झाडांच्या झावळ्या व नारळ पडून इमारतीचे पत्रे फूटून इमारतीचे नुकसान होत आहे. तसेच जोराच्या वाऱ्या पावसाने झाड पडून जिवित हानी व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर 02 नग नारळाचे झाडे तातडीने काढणे आवश्यक आहे. **(श्री.बाळकृष्ण शिवराम तेंडुलकर याचे दि.21/04/2022 रोजीचे पत्र)** | 02 नग नारळ |
| 6. | भाईंदर (पु.), विमल डेरी लेन येथिल कृतार्थ जिवन इमारतीच्या आवारात 01 नग उंबर अंदाजे 25 ते 30 फुट उंच वाढलेला असुन झाडाचा खोड खराब झालेला असुन झाड एका बाजुला वाकलेले आहे. जोराच्या वा-याने झाडाच्या फांद्या रस्त्यावर ये-जा करणा-या रहिवांश्यांवर पडुन जिवित हानी व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच सदरचे झाड काढून पुर्नरोपन करणे शक्य नाही. तरी सदर 01 नग झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. **(कृतार्थ जीवन को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.04/05/2022 रोजीचे पत्र)** | 01 नग उबंर |
| 7. | भाईंदर (प.), गांधीनगर ब्रम्हदेव मंदिर च्या समोर स्मशानभुमी रोड, येथिल घराच्या आवारात 01 नग नारळाचे झाड अंदाजे 40 ते 45 फुट उंच वाढलेले असुन जोराच्या वाऱ्यामुळे घरावर झुकत असुन नारळ व झावळ्या पडून पत्रे फूटून घराचे नुकसान होत आहे. तसेच जोराच्या वाऱ्या पावसाने झाड पडून जिवित हानी व वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदर 01 नग नारळाचे झाड तातडीने काढणे आवश्यक आहे. **(श्री.मनोज रामू खेडेकर यांचे दि.29/04/2022 रोजीचे पत्र)** | 01 नग नारळ |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३


जा.क्र./मनपा/वृ.प्रा./ /2022-23 दिनांक :-

| अ.क्र. | ठिकाणाचे नाव | संख्या |
|---|---|---|
| 8. | मौजे भाईंदर सी.स.क्र.1826, 2278 येथे गुरुविधा इंटरप्रायजेस कंपनीच्या इमारतीच्या बांधकामामध्ये 01 नग कडुलिंब अंदाजे 30 ते 40 फुट, 01 नग आंबा अंदाजे 35 ते 40 फुट, 03 नग नारळ अंदाजे 30 ते 40 फुट, 02 नग जाम अंदाजे 20 ते 30 फुट उंच अशी एकुण 07 नग झाडे बाधीत होत आहेत. या कारणास्तव सदर 07 नग झाडे तातडीने काढणे आवश्यक आहे.<br>**(मे. गुरुविधा इटंरप्रायजेस यांचे दि.14/03/2022 रोजीचे पत्र.)** | 01 नग कडुलिंब<br>01 नग आंबा<br>03 नग नारळ<br>02 नग जाम |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची/स्थलांतरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरीकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून 7 दिवसाच्या आत लेखी स्वरूपात उप-आयुक्त् (उदयान), उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग, पहिला मजला, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे व mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदती नंतर प्राप्त होणाऱ्या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही. तसेच सदरची सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळा वर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. याची कृपया नोंद घ्यावी.

Gunijan

**(योगेश गुणिजन)**
**सहा.आयुक्त तथा वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**